परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३४६
Website:www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007
Phone: 2025621346
E-mail: St-management@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस अ‍ॅण्ड टी/ ९३४९ दिनांक : २५ जून, २०२२

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय :** परीक्षांचे निकाल घोषित/जाहीर झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अंतर्गत गुणांसंदर्भात नियमावली व कार्यपध्दतीबाबत...

**संदर्भ :** १. परीक्षा विभागाचे पत्र क्र. परीक्षा/अभि./१०२८, दिनांक १२.०९.२०१८.
२. परिपत्रक क्र. २५६/२०१९, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१९.
३. मा. परीक्षा व मूल्यमापन मंडाळाचा ठराव क्र. १८/२०२०, दि. २९.०५.२०२०.
४. मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. १२१/०८०६२०, दि. ०८.०६.२०२०.
५. परिपत्रक क्र. २१७/२०२०, दिनांक २८.०७.२०२०.

महोदय/महोदया,

सर्व संबंधिताना कळविण्यांत येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ च्या सत्र परीक्षेपासून सर्व विद्याशाखांतर्गत येणाऱ्या अंतर्गत गुणांच्या नोंदणीबाबत खालीलप्रमाणे कळविण्यांत येत आहे :

१. विद्यापीठाच्या लेखी परीक्षा सुरू होण्यापूर्वी संगणक प्रणालीद्वारे तसेच विहीत मुदतीत Practical/ Oral/ Viva/ Dessertation/Project/Project Work इ. अंतर्गत परीक्षेचे गुण भरणे आवश्यक आहे.

२. ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ सत्राच्या परीक्षेपासून निकाल जाहीर झाल्यानंतर महाविद्यालयीन पातळीवर घेण्यात येणाऱ्या सर्व Practical/Oral/Viva/Dessertation/Project/Project Work इ. अंतर्गत परीक्षेचे गुण निकाल जाहीर झाल्यानतर स्वीकारणे हे निकाल प्रक्रियेस विलंब होतो. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ८९ प्रमाणे ३० ते ४५ दिवसांत निकाल जाहीर करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठाकडे महाविद्यालय/संस्थांकडून उपलब्ध गुण व तत्सम लेखी माहिती यांच्या अनुषंगाने निकाल जाहीर करण्यात येतील. सबब निकाल जाहीर झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अंतर्गत गुण स्वीकारले जाणार नाहीत.

३. विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांचे Practical/ Oral/ Viva/ Dessertation/Project/ Project Work इ. अंतर्गत गुण विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर प्रचलित पध्दतीप्रमाणे संगणक प्रणालीद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भरल्यानंतर त्याची एक छापील प्रत विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी मा. प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने महाविद्यालय/संस्थेच्या फलकावर लावण्यात यावी.

Popatrao Kisanrao Thorat College
Khutbav, Tal. Daund, Dist. Pune.
Inward No: 2/0597 Date: 29/06/2022
File Section: University Circular

Scanned by CamScanner

